# कोविड-१९ चा ताळेबंदी परिस्थितीत विद्यार्थी शिक्षकांच्या जाणिव जागृतीचा अभ्यास

डॉ.सुनिता अनिल नेमाडे,
सहाय्यक प्राध्यापक,
के.सी.ई.सोसायटीचे,
शिक्षणशास्त्र व शारारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालय, जळगाव (महाराष्ट्र)

**सारांश**

कोविड-१९ चा ताळेबंदी परिस्थितीत विद्यार्थी शिक्षकांच्या जाणिव जागृतीचा अभ्यास करण्यासाठी संशोधकाने वर्णनात्मक संशोधन पद्धतीतील सर्वेक्षण पद्धतीचा अवलंब केला आहे.माहितीचे संकलन करण्यासाठी २० प्रश्नांची प्रश्नावली तयार करण्यात आली. विद्यार्थी शिक्षक म्हणून शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील ८० विद्यार्थी शिक्षक आणि ५० माध्यमिक शाळांमध्ये कार्यरत शिक्षक,डी.टी.एड. विद्यालयातील शिक्षकांनी प्रश्नावलीतील प्रश्नांना दिलेल्या प्रतिसादांना गुणदान करून त्या आधारावर शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थी शिक्षक आणि माध्यमिक शाळांमध्ये कार्यरत शिक्षक,डी.टी.एड. विद्यालयातील शिक्षकांच्या जाणिव जागृतीचा स्तर तपासला. संकलीत माहितीचे विश्लेषण करण्यासाठी शेकडेवारी,मध्यमान,प्रमाण विचलन,आणि टी-मूल्य या संख्याशास्त्रीय परिमाणांचा उपयोग केला आहे. त्यात शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थी शिक्षकांच्या जाणिव जागृतीचा स्तर ८४.५८ % तर माध्यमिक शाळांमध्ये कार्यरत शिक्षक,डी.टी.एड. विद्यालयातील शिक्षकांच्या जाणिव जागृतीचा स्तर ८५.६०%दिसून आला.तसेच शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थी शिक्षक आणि माध्यमिक शाळांमध्ये कार्यरत शिक्षक,डी.टी.एड. विद्यालयातील शिक्षक यांच्या कोविड-१९ चा ताळेबंदी परिस्थितीत जाणिव जागृतीमध्ये लक्षणीय फरक नसल्याचे आढळले.

**Key Word-** कोविड-१९, ताळेबंदी परिस्थिती, जाणिव जागृती.

**प्रस्तावना-**

आज आपण सर्व कोविड-१९ सारख्या जागतिक स्तरावरील संसर्गजन्य आजारास सामोरे जात आहोत. या आजाराने सर्व जगाला हादरुन टाकले असून यावर कोणतीही लस उपलब्ध नसल्याने ताळेबंदी हाच एकमेव पर्याय जगभर अवलंबविला जात आहे.याचा प्रभाव सर्व क्षेत्रावर होत आहे.सर्वक्षेत्र आहे तिथेच थांबले आहेत.याचा परिणाम शिक्षणक्षेत्रावर सुद्धा झाला.त्यामुळे तिथे सुद्धा इतर क्षेत्रासारखी परिस्थिती निर्माण झाली याची आपणास जाणिव आहे.परंतु शिक्षकाना थांबून कसे चालेल?ते सतत कार्यप्रवीण असावे लागतात.कारण शिक्षक समाज परिवर्तनाचे गतीवर्धक असतात. त्यांना सामाजिक स्थीत्यतंरे जाण्यासाठी आणि शिक्षण गतिमान होण्यासाठी अद्यायावत असावे लागते. त्यांना सद्य स्थितीचे ज्ञान,समयसूचकता,सतर्कता,समस्येविषयी सखोल ज्ञान,त्याच्या नोंदी ठेवण्याची सवय असणे आवश्यक असते,तसेच नवीन तंत्रज्ञान आत्मसात करण्यासाठी विविध स्त्रोताचा उपयोग करता येणे आवश्यक असते.

शिक्षकाना माहिती तंत्रविज्ञानाच्या या युगात आपले ज्ञान अद्यायावत ठेऊन अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करता येणे क्रमप्राप्त ठरते. आज रोजीच्या या ताळेबंदी परिस्थितीत कॉविड-१९ या आजाराविषयी आजचा शिक्षक आणि भावी शिक्षक किती जागरुक आहेत? हे जाणून घेण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाच्या आधारावर गुगल फॉर्म चा वापर करून याचा शोध घ्यावा या विचाराने प्रेरित होऊन प्रस्तुत संशोधन कार्य हाती घेतले आहे.

**समस्या विधान -** कोविड-१९ चा ताळेबंदी परिस्थितीत विद्यार्थी शिक्षकांच्या जाणिव जागृतीचा अभ्यास करणे.

**उद्दिष्ट-**

१ शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थी शिक्षकांच्या कोविड-१९ च्या ताळेबंदी परिस्थितीच्या जाणिव जागृतीचा अभ्यास करणे.

२ माध्यमिक शाळांमध्ये कार्यरत शिक्षक,डी.टी.एड. विद्यालयातील शिक्षकांच्या कोविड-१९ च्या ताळेबंदी परिस्थितीच्या जाणिव जागृतीचा अभ्यास करणे.

३ शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थी शिक्षक आणि माध्यमिक शाळांमध्ये कार्यरत शिक्षक,डी.टी.एड. विद्यालयातील शिक्षकांच्या कोविड-१९ च्या ताळेबंदी परिस्थितीच्या जाणिव जागृतीचा तुलनात्मक अभ्यास करणे.

**परिकल्पना-**

शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थी शिक्षक आणि माध्यमिक शाळांमध्ये कार्यरत शिक्षक,डी.टी.एड. विद्यालयातील शिक्षकांच्या कोविड-१९ च्या ताळेबंदी परिस्थितीच्या जाणिव जागृतीमध्ये सार्थ फरक आढळत नाही.

**संशोधन पद्धती**-

प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीतील सर्वेक्षण पद्धतीचा वापर करण्यात आलेला आहे. शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थी शिक्षक आणि माध्यमिक शाळांमध्ये कार्यरत शिक्षक,डी.टी.एड. विद्यालयातील शिक्षकांच्या कोविड-१९ च्या ताळेबंदी परिस्थितीच्या जाणिव जागृती या विषयी जाणून घेण्यासाठी या पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. त्यात त्यांना मिळालेल्या गुणांचे विश्लेषण करून परिकल्पना परिक्षण व निष्कर्ष मांडणी केली आहे.

**जनसंख्या-**

प्रस्तुत संशोधनासाठी जळगाव शहरातील शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थी शिक्षक आणि माध्यमिक शाळांमध्ये कार्यरत शिक्षक,डी.टी.एड. विद्यालयातील शिक्षक वर्गाचा समावेश आहे.

**न्यादर्श-**

प्रस्तुत संशोधनासाठी न्यादर्श म्हणुन जनसंख्येत समाविष्ठ विद्यार्थी शिक्षक आणि माध्यमिक शाळांमध्ये कार्यरत शिक्षक,डी.टी.एड. विद्यालयातील शिक्षक यांना व्हाटस ॲप द्वारे संशोधक निर्मित गुगल फॉर्म ची लिंक पाठवण्यात आली होती.त्यात एकूण १७२ प्रतीसाध्कानी सदर प्रश्नावली भरून देली त्या सर्वांचा प्रस्तुत संशोधनातील न्यादर्शात समावेश करण्यात आला आहे.

**संशोधन साधने-**

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने स्वनिर्मित कोविड-१९ जाणिव जागृती प्रश्नावली विकसित केली. प्रस्तुत प्रश्नावलीत कोविड-१९ आजारा विषयी शास्त्रीय माहिती ,या विषयी घ्यावयाची काळजी ताळेबंदी काळातील राबविलेले कार्यक्रम , शिक्षण प्रणालीतील बदल यावर आधारित एकूण २० प्रश्नाचां समावेश केलेला आहे.

यामध्ये प्रत्येक प्रश्नासाठी ०४ पर्याय दिलेले असून अचूक पर्यायास एक गुण(१) अशा एकूण २० गुणांची आहे.प्रतीसाधकानी दिलेल्या प्रतिसादांचे विश्लेषण करून संशोधनाचे निष्कर्ष मांडण्यात आले आहे.

**संख्याशास्त्रीय परिमाणे-**

प्रस्तुत संशोधनासाठी संकलित माहितीचे विश्लेषण करण्यासाठी प्रतीसादकाना मिळालेल्या गुणांचे मध्यमान व शेकडा प्रमाण काढून आलेखाद्वारे तुलनात्मक विश्लेषण करण्यात आले आहे.तसेच संशोधनात मांडलेल्या परीकाल्पनेचे टी ( t ) परीक्षेद्वारे परीक्षण करून त्या बाबत निर्णय घेण्यात आले आहे.

**उद्दिष्टनिहाय परीक्षण-**

**उद्दिष्ट क्रमांक १**-शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थी शिक्षकांच्या कोविड-१९ च्या ताळेबंदी परिस्थितीच्या जाणिव जागृतीचा अभ्यास करणे

| एकूण विद्यार्थी संख्या | स्तर(टक्केवारी) |
|---|---|
| ८० | ८४.५८ % |

**निरिक्षण**- वरील कोष्टकावरून शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थी शिक्षकांच्या कोविड-१९ च्या ताळेबंदी परिस्थितीच्या जाणिव जागृतीचे प्रमाण ८४.५८ % इतकी दिसून आले.

**निष्कर्ष-** वरील कोष्टकावरूनअसे दिसून येते कि शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थी शिक्षकांच्या कोविड-१९ च्या ताळेबंदी परिस्थितीच्या जाणिव जागृतीचा स्तर उच्चप्रतीचा आहे.

**उद्दिष्ट क्रमांक २**- माध्यमिक शाळांमध्ये कार्यरत शिक्षक,डी.टी.एड. विद्यालयातील शिक्षकांच्या कोविड-१९ च्या ताळेबंदी परिस्थितीच्या जाणिव जागृतीचा अभ्यास करणे.

| एकूण शिक्षक संख्या | स्तर(टक्केवारी) |
|---|---|
| ५० | ८५.६० % |

**निरिक्षण-** वरील कोष्टकावरून माध्यमिक शाळांमध्ये कार्यरत शिक्षक,डी.टी.एड. विद्यालयातील शिक्षकांच्या कोविड-१९ च्या ताळेबंदी परिस्थितीच्या जाणिव जागृतीचे प्रमाण ८५.६०% इतके दिसून आले.

**निष्कर्ष-** वरील कोष्टकावरूनअसे दिसून येते कि माध्यमिक शाळांमध्ये कार्यरत शिक्षक,डी.टी.एड. विद्यालयातील शिक्षकांच्या कोविड-१९ च्या ताळेबंदी परिस्थितीच्या जाणिव जागृतीचा स्तर उच्चप्रतीचा आहे.

**उद्दिष्ट क्रमांक ३** - शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थी शिक्षक आणि माध्यमिक शाळांमध्ये कार्यरत शिक्षक,डी.टी.एड. विद्यालयातील शिक्षकांच्या कोविड-१९ च्या ताळेबंदी परिस्थितीच्या जाणिव जागृतीचा तुलनात्मक अभ्यास करणे.

| एकूण प्रतिसादक संख्या | स्तर(टक्केवारी) |
|---|---|
| एकूण विद्यार्थी संख्या ८० | ८४.५८% |
| एकूण शिक्षक संख्या ५० | ८५.६०% |

**निरिक्षण-** वरील कोष्टकावरून शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थी शिक्षकाच्या जाणिव जागृतीचे प्रमाण ८४.५८ % इतके दिसून आले तर माध्यमिक शाळांमध्ये कार्यरत शिक्षक,डी.टी.एड. विद्यालयातील शिक्षकांच्या जाणिव जागृतीचे प्रमाण ८५.६०% इतके दिसून आले.

**निष्कर्ष-**

वरील कोष्टकावरून असे दिसून येते कि शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थी शिक्षक आणि माध्यमिक शाळांमध्ये कार्यरत शिक्षक,डी.टी.एड. विद्यालयातील शिक्षकांच्या कोविड-१९ च्या ताळेबंदी परिस्थितीच्या जाणिव जागृतीमध्ये माध्यमिक शाळांमध्ये कार्यरत शिक्षक,डी.टी.एड. विद्यालयातील शिक्षकांचा कोविड-१९ च्या ताळेबंदी परिस्थितीच्या जाणिव जागृतीचा स्तर शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थी शिक्षकापेक्षा अधिक दिसून आला आहे

**परिकल्पना परीक्षण** -

शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थी शिक्षक आणि माध्यमिक शाळांमध्ये कार्यरत शिक्षक,डी.टी.एड. विद्यालयातील शिक्षकांच्या कोविड-१९ च्या ताळेबंदी परिस्थितीच्या जाणिव जागृतीमध्ये सार्थ फरक आढळत नाही.

| अ.क्र | प्रतिसादक गट | एकूण प्रतिसादक संख्या (N) | मध्यमान (M) | प्रमाण विचलन (SD) | टेबल नमुना "t" मुल्य | प्राप्त "t" मुल्य | त्याग / स्वीकार |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | विद्यार्थी संख्या | ८० | १७.१९ | १.४८ | १.९६ | ०.०५७ | स्विकार |
| २ | शिक्षक संख्या | ५० | १७.७३ | १.६० | | | |

**अर्थनिर्वचन-**

डी कोष्टका नुसार ०.०५ सार्थकता स्तरावर स्वाधीनता मात्रा DF= १२८ साठी संख्या शास्त्रीय टेबल नुसार t चे नमुना मूल्य १.९६ आहे आणि प्राप्त t मुल्य ०.०५७ आहे.

प्राप्त t मुल्य हे नमुना t मुल्या पेक्षा कमी आहेत्या मुळे दोघातील फरक सार्थ आहे म्हणून शून्य परीकल्पनेचा स्विकार करावा लागेल. या वरून असे म्हणता येईल की शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थी शिक्षक आणि माध्यमिक शाळांमध्ये कार्यरत शिक्षक,डी.टी.एड. विद्यालयातील शिक्षकांच्या कोविड-१९ च्या ताळेबंदी परिस्थितीच्या जाणिव जागृतीमध्ये सार्थ फरक आढळत नाही.

**निष्कर्ष-**

शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थी शिक्षक आणि माध्यमिक शाळांमध्ये कार्यरत शिक्षक,डी.टी.एड. विद्यालयातील शिक्षकांच्या कोविड-१९ च्या ताळेबंदी परिस्थितीच्या जाणिव जागृतीमध्ये सार्थ फरक आढळत नाही.हि परिकल्पना स्वीकारावी लागेल.

**निष्कर्ष व चर्चा-**

**उद्दिष्टनिहाय निष्कर्ष-**

१ शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थी शिक्षकांच्या कोविड-१९ च्या ताळेबंदी परिस्थितीच्या जाणिव जागृतीचे स्तर ८४.५८ % इतका म्हणजेच उच्चप्रतीचा दिसून आला आहे

२ माध्यमिक शाळांमध्ये कार्यरत शिक्षक,डी.टी.एड. विद्यालयातील शिक्षकांच्या कोविड-१९ च्या ताळेबंदी परिस्थितीच्या जाणिव जागृतीचे प्रमाण ८५.६०% इतका म्हणजेच उच्चप्रतीचा दिसून आला आहे.

३ शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थी शिक्षकाच्या कोविड-१९ च्या जाणिव जागृतीचा स्तर ८४.५८ % असून माध्यमिक शाळांमध्ये कार्यरत शिक्षक,डी.टी.एड. विद्यालयातील शिक्षकांच्या कोविड-१९ च्या जाणिव जागृतीचे प्रमाण ८५.६०% इतका आहे.अर्थात विद्यार्थी शिक्षकाच्या कोविड-१९ च्या जाणिव जागृतीच्या स्तरापेक्षा माध्यमिक शाळांमध्ये कार्यरत शिक्षक,डी.टी.एड. विद्यालयातील शिक्षकांच्या कोविड-१९ च्या जाणिव जागृतीचा स्तर तुलनेने २ ने अधिक आहे व तो संख्याशास्त्रीय दृष्टीने लक्षणीय नाही.

**परिकल्पना निष्कर्ष-**

शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थी शिक्षक आणि माध्यमिक शाळांमध्ये कार्यरत शिक्षक,डी.टी.एड. विद्यालयातील शिक्षकांच्या कोविड-१९ च्या ताळेबंदी परिस्थितीच्या जाणिव जागृतीमध्ये सार्थ फरक आढळत नाही त्यामुळे शून्य परिकल्पनेचा स्विकार केला आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची-**

१ कॉविड -१९ (नवीन कोरोना विषाणू आजार-nCov)माहिती पुस्तिका ,सार्वजनिक आरोग्य विभाग,महाराष्ट्र शासन)

२ वीरकर प्र.कृ.,वीरकर प्रतिभा,उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण व शिक्षक

(भाग-२),व्दारका प्रकाशन,पुणे.

३ मुळे रा.श.,उमाठे वि.तु. (१९८७) शैक्षणिक संशोधन पध्दती, नित्य नूतन प्रकाशन, पुणे

४ वेब साईट-

1 https://www.mathfw.gov.in

2 https://mygov.in.covid-19

.